**निमित्ताने**

# गांधी-आंबेडकर भावविश्वाचा अन्वयार्थ

अशोक इंगळे

जगभरातील माणसांच्या मनपटलावर विराजमान असलेल्या महात्मा गांधींच्या जन्माला येत्या २ ऑक्टोंबर २०१९ रोजी तब्बल दिडशे वर्ष पूर्ण होत आहेत. शांती, अहिंसा व समन्वयाच्या माध्यमातून हा विचार जगभर पसरला. देशात गांधीवादी विचारांची पेरणी या १५० वर्षातच झाली. मात्र हल्ली भारताच्या राजकीय पटलावरून महात्मा गांधीजींच्या विचारांना मोठ्या खुबीनं बाजूला सारल्या जात आहे. थोर विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे म्हणतात की, गांधी, नेहरू, आंबेडकर यांची नावंच इतिहासातून पुसली जाण्याची शक्यता आहे, असं वातावरण निर्माण केलं गेलंय. म्हणूनच गांधी आणि आंबेडकर यांचा विचार आज पुन्हा नव्या पिढीसमोर नव्याने चर्चेला येणे गरजेचे झाले आहे. महात्मा गांधीजींच्या १५०व्या जयंती वर्षानिमित्ताने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा घेतलेला हा वेध.

स्वातंत्र्य संगराच्या लढ्याचे प्रवर्तक विचारवंत, राजकीय नेते म्हणून महात्मा गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता आज अनेकार्थानं वाढली आहे. वर्तमानात कारणंही तशीच घडत आहेत. वस्तुतः महात्मा गांधींच्या विचारांशी काही बाबतीत मी पूर्णांशानं सहमत नसतानादेखील त्यांच्या विचारांवर लेखन न करणे लेखकाच्या सृजनशील संवेदनशीलतेला धरून होणार नाही, असे मी मानतो. कारण आताशा, आपण सर्वच जण एका अरिष्टमय अराजकीय स्थितीतून मार्गक्रमण करीत आहोत. सर्वांगाने वाढत असलेल्या या अराजकतेला परतून लावायचे असेल तर नव्या पिढीला महात्मा गांधींच्या विचारांची प्रासंगिकता नवे अन्वयार्थ लावत त्यांचा विचार पटवून देणे ही वर्तमान काळाची मोठी गरज बनलेली आहे. प्रस्तुत गरजेतूनच महात्मा गांधींच्या भावविश्वाचा संक्षेपाने वेध घेण्याचा प्रयत्न सदर लेखात केला आहे.

भारतीय स्वातंत्र्य युद्धाचे समर म्हटले की, भारतीय माणसासमोर महात्मा गांधी यांची प्रतिमा उभी राहते. तर समाजरचनेच्या मन्वंतराचे युद्ध म्हटले की, भारतीय मनपटलापुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा उभी राहते. त्यातीलच एका व्यक्तीचा विचार हा 'गांधीवाद' म्हणून ओळखला जातो तर बाबासाहेबांचा विचार हा 'आंबेडकरवाद' या अन्वर्थक संज्ञेनं या मातीत रुजत आहे. मात्र मार्क्सवाद व आंबेडकरवाद जसा साहित्यात रूजला तसा गांधीवाद साहित्यात फारसा रुजला नाही, हे लक्षात घ्यावे लागेल. एकाने स्वातंत्र्य समराच्या युद्धासाठी निपचीत पडलेल्या माणसाच्या हृदयात प्राण फुंकले. तर, दुसऱ्याने मरणासन्न निर्जीव झालेल्या माणसाला स्वाभिमानाने लढायला शिकविले.

---

लेखक बुलडाणास्थित जिजामाता महाविद्यालयामध्ये मराठीचे प्राध्यापक आहेत.
ईमेल : ashokingle73@gmail.com

हया दोन्ही क्रांतिकारकांच्या या महान क्रांत्या भारतीय नागरिक म्हणून आपण विसरू शकत नाही. त्या दोन्ही स्मृती आपण काळजात साठून ठेवलेल्या आहेत.

लिओ स्टॉलटाय, जॉन रस्किन व गोपाळ कृष्ण गोखले या तीन व्यक्तींचा गांधीजींच्या व्यक्तिमत्वावर प्रभाव होता. तर बाबासाहेबांनी तथागत गौतम बुद्ध, संत कबीर व महात्मा जोतिबा फुले यांना आपले गुरू मानले होते. दोन्ही महामानवांची नाममुद्रा भारतीय इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी कोरलेली आहे. दोघांनाही इतिहासाच्या पानावरून पुसले तर भारतीय इतिहासच शिल्लक उरणार नाही. एक शांती व अहिंसेची कबुत्तरं उडवित होता. त्याचवेळी दुसरा चवदार तळ्याचे पाणी प्रज्वलित करून क्रांतीची फुले फुलवित होता. दोन्ही गोष्टींची गरज त्यासमयी नव्हती असे आपण कसे म्हणू शकतो? भारतीय समाजाचं मन असं विविधतेनं नटलं होतं. म्हणूनच विविधतेनं नटलेल्या देशात जेवढी आवश्यकता महात्मा गांधींच्या विचारांची होती. तितकीच किंबहुना त्यापेक्षा अधिक गरज सर्वहारा वंचित समूहाला बाबासाहेबांची वाटत असावी, असे म्हणता येईल.

गांधी आणि आंबेडकर ह्या वलयांकित व्यक्ती. गांधींचं वलय संपूर्ण भारतात दिसतं. आंबेडकरांचं वलयदेखील भारतभरच. एक राजकीय क्षेत्रात प्रभावी होता. दुसरा बहिष्कृत भारताच्या सामाजिक मन्वंतराच्या जगात आपलं अस्तित्व निर्माण करीत होता. एक पदवीनं बॅरिस्टर. तर दुसरा वकिली करुन अडचणींमध्ये असणाऱ्यांना न्याय मिळवून देत होता. 'माझे सत्याचे प्रयोग' या नावाने गांधींजींचे आत्मचरित्र प्रकाशित आहे. त्यांनी केवळ दोनच पुस्तकं लिहिलीत त्यातील पहिलं १९०८- ०९मध्ये हिंद स्वराज्य व त्यानंतर सत्याग्रह इन साऊथ आफ्रिका हे दुसरं पुस्तक म्हणता येईल. बाकी उर्वरित लेखन त्यांनी यंग इंडिया व हरिजनमध्ये अग्रलेखाच्या स्वरूपात केलेले दिसून येईल. गांधींजींच्या विचारसरणीमध्ये सत्याग्रह, अहिंसा, शांती व विश्वस्त संकल्पना, रामराज्य, ग्राम - अर्थशास्त्र, सत्याचे प्रयोग आणि आतला आवाज इ. बाबी महत्त्वाच्या ठरतात. बाबासाहेबांची ग्रंथरचना तुलनेत विपुल आहे. त्यांनी स्वतः काढलेल्या वृत्तपत्रातूनही लेखन केले. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि लोकशाहीनिष्ठ विचारसरणीचे ते प्रणेते होते.

गांधींजींनी औद्योगिकीकरणाला, वकिलांना, रेल्वेला, डॉक्टरांना व तंत्रज्ञानालादेखील विरोध केला. मात्र स्वत: त्यांनी रेल्वेच्या थर्ड क्लास डब्यात बसून प्रवास केला. आपल्या कमरेला ते घड्याळ बांधून फिरत असत. असा अंतर्विरोध त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. बाबासाहेब मात्र तंत्रज्ञानाचे स्वागत करीत होते. शहराकडे चला म्हणत होते. गांधीजींच्या विचारात सुसंगतता व सुस्पष्टता दिसून येत नव्हती. म्हणूनच गांधीजी खेड्याकडे चला असा संदेश देत होते. असे असले तरी गांधीजींना कुठल्याही एका साच्यात बसवता येत नाही. सतत प्रवाही असलेलं व्यक्तिमत्व. स्वत:ला सनातन हिंदु समजणारे, भगवत गीता नि चातुर्वर्ण्य मानणारे म. गांधी बाबासाहेबांच्या सहवासात आल्यानंतर बदलले. आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार करू लागले. अस्पृश्यता हिंदू धर्मावरील कलंक आहे असे समजू लागले. पुणे करारानंतर गांधी खूप बदलले. बाबासाहेबांनी हिंदू धर्म सोडून जाऊ नये म्हणून त्यांनी अथक प्रयत्न केले. घटना समितीवर ते पुन्हा बिनविरोध निवडून यावेत म्हणून त्यांनी काँग्रेसच्या नेत्यांना सांगितले. बाबासाहेबही काँग्रेस हे जळतं घर आहे असे म्हणत असले तरी देशकार्यासाठी ते पुन्हा काँग्रेसपक्षामधून निवडून आले. अर्थात तेही बदलत गेले हे गांधींजींच्या विरोधकांनी समजून घेतले पाहिजे.

गांधीजींना मानणारा व विरोध करणारा एक वर्ग जसा संपूर्ण भारतात दिसतो. तेच बाबासाहेबांच्या बाबतीत म्हणता येईल. असे असले तरी गांधी जनमानसात लोकप्रिय होते. त्यांच्यावर चरित्रात्मक लेखन विपुल झाले. इंग्रजी भाषेमध्ये पन्नासेक चरित्र तरी सापडतील. मराठीमध्ये गोविंद तळवलकर, नरेंद्र चपळगावकर,

नलिनी पंडित, ग. प्र. प्रधान, नरहर कुरुंदकर, प्रेमानंद गज्वी, दत्ता भगत, शफाअत खान, पु. ल. देशपांडे, यशवंत सुमंत, प्रदीप दळवी, अजित दळवी, अवंतिकाबाई गोखले, मिलिंद बोकील, वि. स. खांडेकर व सुरेश द्वादशीवार आदीं लेखकांनी गांधीजींवर लेखन केले आहे. शिवाय गांधीजींचे पूर्ण लेखन १९६०मध्ये भारत सरकारने संकलित महात्मा गांधी या नावाखाली प्रकाशित केले. यामध्ये जवळपास १०० खंड असून त्यांची ५०,००० पृष्ठसंख्या आहे. मराठी कवितेमध्ये 'गांधी मला भेटला' ही वसंत दत्तात्रेय गुर्जर यांची कविता. कुसुमाग्रज, लोकनाथ यशवंत आदींच्या कविता आठवतात. पण बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वावर तर मराठी व हिंदीमध्ये कवितांचा पाऊसच पडला आहे.

ब्रिटिश चित्रपट दिग्दर्शक सर 'रिचर्ड ॲटनबरो' यांनी गांधींच्या आयुष्यावर इंग्रजी चित्रपटाची निर्मिती केली. यात महात्मा गांधीजींची भूमिका 'बेन किंग्जले' या कसलेल्या ब्रिटिश अभिनेत्याने केली. हा चित्रपट इ. स. १९८१मध्ये प्रदर्शित झाला होता. इ. स. २००६मध्ये बॉलिवूडच्या विधू विनोद चोपडा यांनी 'लगे रहो मुन्नाभाई' या विनोदी चित्रपटाची निर्मिती केली. 'ॲन्ड गांधी गोज मिसिंग' हा मराठी लघुपटही दिग्दर्शक देवेंद्र जाधव यांनी प्रदर्शित केला. पुढे हा लघुपट सर्व भारतीय भाषांत अनुवादित झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर सर्वप्रथम दिग्दर्शक जब्बार पटेल यांनी मूळ इंग्रजी चित्रपट इ. स. २००० मध्ये प्रदर्शित केला. हा चित्रपट नंतर हिंदी व्यतिरिक्त मराठी, तमिळ, पंजाबी, बंगाली, उडिया व गुजराती भाषांत डब झालेला आहे. या चित्रपटात डॉ. आंबेडकरांची भूमिका प्रसिद्ध दक्षिण अभिनेता मामूट्टी यांनी साकारली आणि म. गांधींची भूमिका मोहन गोखले यांनी साकारली होती. बाबासाहेबांवर एक मराठी चित्रपटही दिग्दर्शक प्रकाश जाधव यांनी प्रदर्शित केला. असे विलक्षण साम्य दोन महापुरुषांमध्ये पाहावयास मिळते.

एकीकडे कमालीचे साम्य तर दुसरीकडे गांधी व आंबेडकरांच्या अनुयायांमध्ये एकमेकांचा टोकाचा विरोध पाहायला मिळतो. हा विरोध जसा बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांकडून पाहायला मिळतो. तसाच तो गांधींजींच्या भक्तांकडूनही वेगवेगळ्या कारणांनी होत असतो. मला असे वाटते की, गांधी व आंबेडकरांबद्दल केवळ भावनिक विचार केल्यामुळे असे दूषित सामाजिक पर्यावरण निर्माण झाले असावे. दोघांमधील विरोधाची ही दरी कमी करायची असेल तर या दोन्ही महापुरुषांच्या विचारांमध्ये सुसंवादाचे वैचारिक पूल निर्माण होणे गरजेचे आहे. हीच महात्मा गांधी यांना त्यांच्या १५०व्या जयंतीदिनी खरी आदरांजली ठरेल.

●

**टिप** : १७ ऑगस्ट २०१९ च्या साधना साप्ताहिकातील डॉ. रावसाहेब कसबे यांची डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, चंद्रकांत भोंजाळ व भारत सासणे यांनी घेतलेल्या मुलाखतीचा आधार प्रस्तुत लेखनासाठी झाला आहे.


**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक मिळण्याची ठिकाणे**

माणगावकर एजन्सी

५३८ अ, शनिवार पेठ, किबे लक्ष्मी थिएटरसमोर,
अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११०३०
भ्र. ७०२००४४६५५

अथर्व पब्लिकेशन्स

तळमजला, ओम हॉस्पिटल,
ॲग्लो उर्दू हायस्कूलजवळ, दत्त कॉलनी,
जळगाव-४२५००१
दू. ०२५७-२२३९६६६